महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/संविधान दिन,महा.नि.दिन/२०२२/ 5223
दिनांक : 25 NOV 2022

## परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्था.

**विषय : दिनांक २६ नोव्हेंबर, संविधान दिन ते ६ डिसेंबर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीत समता पर्व आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ : १. महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक : सान्यावि - २०२२/प्र.क्र.२२९/बांधकामे -दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२२.**

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र शासन विभाग सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांनी निर्गमित केलेले शासन परिपत्रक सोबत जोडण्यात आलेले आहे. संविधान निर्मितीमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मोठे योगदान असल्यामुळे संविधानाची ओळख सर्वांना करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच ०६ डिसेंबर हा दिवस भारतीयांसाठी दुःखाचा, गांभीर्याने पालन करावयाचा दिवस असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीने दिनांक २६ नोव्हेंबर,२०२२, संविधान दिन ते ६ डिसेंबर, २०२२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीतील आयोजित समता पर्वामध्ये शासन परिपत्रकान्वये पुढीलप्रमाणे या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व संस्थाप्रमूखांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

| सर्व संस्थाप्रमूख यांनी पूढीलप्रमाणे कार्यक्रम/उपक्रम राबविण्यात यावे. | | |
|---|---|---|
| २६ नोव्हेंबर २०२२ | Walk for Constitution/ प्रभात फेरी | या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व संस्थांनी प्रभात फेरीचे आयोजन करावे. |
| | संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन व तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात यावे. | या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व संस्थाप्रमूखांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन व तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन करण्यात यावे. |
| २७ नोव्हेंबर २०२२ | निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा, लेखी परिक्षा, वक्तृत्व स्पर्धा व इतर कार्यक्रम राबविण्यात यावे. | या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत सर्व संस्थाप्रमूखांनी निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा, लेखी परिक्षा वक्तृत्व स्पर्धा व इतर कार्यक्रम राबविण्यात यावे. |

कृ.मा.प.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुख यांना सूचित करण्यात येते की, या पत्रासोबत दिलेल्या इमेलवर info.dteropune@gmail.com आपल्या संस्थेची अचूक **माहिती दिनांक ०८.१२.२०२२ रोजीपर्यंत सादर करण्यात यावी,** माहिती सादर न केलेल्या संस्थांवर नियमाप्रमाणे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : १ प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**दिनांक २६ नोव्हेंबर, संविधान दिन ते ६ डिसेंबर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीत समता पर्व आयोजित करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : सान्यावि-२०२२/प्र.क्र. २२९/बांधकामे**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२२

**प्रस्तावना :-**

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय तसेच विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य व दर्जा व संधीची समानता प्राप्त करुन देण्याच्या अनुषंगाने दि.२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्यघटना अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण केलेली आहे. सदर राज्यघटना ही दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अंमलात आलेली आहे. त्यानुषंगाने ज्या संविधानाने कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका इत्यादी सारख्या यंत्रणा निर्माण झाल्या त्या संविधानाची ओळख सर्वांना करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

संविधान निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मोठे योगदान असल्यामुळे दिनांक ६ डिसेंबर हा दिवस भारतीयांसाठी दु:खाचा, गांभिर्याने पालन करावयाचा दिवस असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीने दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२, संविधान दिन ते ६ डिसेंबर, २०२२, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीत समता पर्व आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक :-**

दिनांक २६ नोव्हेंबर २०२२, संविधान दिन ते ६ डिसेंबर, २०२२, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीतील आयोजित समता पर्वामध्ये पुढीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात यावेत.

| दिनांक | कार्यक्रम | कार्यक्रम राबविणारी यंत्रणा |
|---|---|---|
| २५ नोव्हेंबर २०२२ | दि.२६ नोव्हेंबर २०२२, संविधान दिन ते दि. ६ डिसेंबर, २०२२, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीतील समता पर्वामध्ये आयोजित कार्यक्रमाबाबत पत्रकार | राज्यातील सर्व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, समाज कल्याण आयुक्तालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे |

| | | |
|---|---|---|
| | परिषदेचे आयोजन व कार्यक्रमास प्रसिध्दी देणे. | |
| २६ नोव्हेंबर २०२२ | Walk for Constitution / प्रभात फेरी | डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे, राज्यातील सर्व अनुदानित, विना अनुदानित महाविद्यालये, सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त असलेले सर्व शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा, समाजकार्य महाविद्यालये, दिव्यांग शाळा, अनुदानित वसतिगृहे इ. |
| | संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन व तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन | राज्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषदा, ग्राम पंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालये |
| | जिल्हास्तरावर पालकमंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्या उपस्थितीत सामाजिक न्याय भवनात कार्यशाळा तथा कार्यक्रमाचे आयोजन | राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| २७ नोव्हेंबर २०२२ | निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा, लेखी परिक्षा, वक्तृत्व स्पर्धा व इतर कार्यक्रम | राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालये, सर्व शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा, समाजकार्य महाविद्यालये, दिव्यांग शाळा, अनुदानित वसतिगृहे इ. |
| २८ नोव्हेंबर २०२२ | संविधानविषयक व्याख्याने (विषय- अधिकार व कर्तव्ये) | राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण |
| २९ नोव्हेंबर २०२२ | सामाजिक न्याय भवनात पत्रकारांची कार्यशाळा (विषय : सामाजिक न्याय विभागाची नवी दिशा) | राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण |
| ३० नोव्हेंबर २०२२ | संविधान या विषयावर भित्तीपत्रक, पोस्टर्स, बॅनर इत्यादी बाबत जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन | डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे<br>राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त व जिल्हा समाज कल्याण अधिकारी जि.प. |

| | | |
|---|---|---|
| | अनुसूचित जाती घटकासाठी कार्य करणारे समाजसेवी कार्यकर्ते, प्रतिनिधी, कर्मचारी वर्ग यांची कार्यशाळा (विषय : अनुसूचित जाती उत्थान : दशा आणि दिशा) | राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| १ डिसेंबर २०२२ | जिल्हास्तरावर युवा गटांची कार्यशाळा | राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| २ डिसेंबर २०२२ | स्थळ भेट : अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींना भेटी (जिल्हयातील विविध तालुक्यात) | राज्यातील सर्व प्रादेशिक उपायुक्त, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद |
| ३ डिसेंबर २०२२ | जेष्ठ नागरीक, दिव्यांग, तृतीयपंथी व वृध्द यांच्यासाठी माहितीची कार्यशाळा | राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद |
| | सामाजिक न्याय विभागाच्या लाभार्थींना विविध लाभाचे वाटप, बक्षिस वितरण | राज्यातील सर्व प्रादेशिक उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद |
| ४ डिसेंबर २०२२ | जात प्रमाणपत्र पडताळणी शिबीर आयोजन | राज्यातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती |
| | राज्यातील सर्व तालुकास्तरावर योजनांच्या माहितीची कार्यशाळा | राज्यातील सर्व तहसिलदार, गट विकास अधिकारी व कृषी अधिकारी |
| ५ डिसेंबर २०२२ | संविधान जागर व येणाऱ्या ६ डिसेंबर, महापरिनिर्वाण दिनाच्या संदर्भात अभिवादनात्मक कार्यक्रमाचे आयोजन | राज्यातील सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद |
| ६ डिसेंबर २०२२ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रमाचे आयोजन, व समता पर्वाचा समारोप | राज्यातील सर्व प्रादेशिक उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद |
| | • राज्यस्तरीय कार्यक्रम<br>• चैत्यभूमीवरील कार्यक्रम<br>• अभिवादन रॅली | डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे |

२. दिनांक २६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर, २०२२ या कालावधी दरम्यान होणाऱ्या समता पर्व कार्यक्रमाच्या सनियंत्रणाकरीता सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत समतादूत उपलब्ध करून देण्याबाबत आदेश काढावेत.

३. सदर कार्यक्रमाच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी त्या त्या जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांची राहील व कार्यक्रमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी पर्यवेक्षणाची जबाबदारी संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांची राहील.

४. सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे यांनी जिल्हयाच्या ठिकाणी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना रु.२.०० लक्ष प्रति जिल्हा व प्रादेशिक स्तरावरील संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांना रु.२.०० लक्ष निधी तसेच आयुक्त समाजकल्याण पुणे यांना रू.२.०० लक्ष इतका निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा.

५. समता पर्व आयोजित करतांना ग्राम पंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद वा राज्य निवडणुक आयोगाने घोषित/लागू केलेल्या अन्य कोणत्याही निवडणुक/पोट निवडणुकीची आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

६. सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२११२५१५२०३६५१२२ असा आहे. सदरचे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANIL KONDAJI AHIRE

Digitally signed by ANIL KONDAJI AHIRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUCTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT,
2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a4735679 8e6c9cf27e4353d60e51,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FD9893035F4DA174C04FA71634FF1F6AA493C7 8A5335F985651F937888DF7A89, cn=ANIL KONDAJI AHIRE
Date: 2022.11.25 15:30:33 +05'30'

**(अ.कों.आहिरे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स.,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग
७. महालेखापाल, महाराष्ट्र ½ ( लेखा अनुज्ञयेता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८. आयुक्त, समाजकल्याण, पुणे
९. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
१३. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१४. सर्व अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, समाजकल्याण
१५. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१२.सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग